Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-3 | Issue-8 | Feb-2014 Available online at www.aygrt.isrj.net

भारतीय स्त्रियांचा दर्जा भ्रम आणि वास्तव

संजयपान संपतराव सुरासे

(राज्यशास्त्र विभाग) कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंकुशनगर
ता.अंबड जि. जालना

सारांश - १९ व्या शतकात भारतात सुरू झालेल्या प्रबोधनाच्या चळवळीने स्त्रियांच्या पारंपारिक स्थितीत परिवर्तन घडवून आनण्यास चालना दिली. त्यामुळे थोड्याफार प्रमाणात त्यांच्या स्थान आणि भूमिकेत बदल घडवूण येण्यास सुरवात झाली. त्यामुळे स्त्री विकासाला चालना मिळाली. स्त्रियांना शिक्षणाचे स्वातंत्र्य दिल्यामुळे थोड्याच काळात स्त्रियांनी गगनभरारी घेतली आणि आपली क्षमता सिद्ध केली. आज अनेक स्त्रिया वेगवेळ्या पदावर काम करत असल्यातरी त्यांच्यावरील पिळवणूक अत्याचार आणि जुलूम यात घट झाली आहे असे म्हणता येत नाही. वास्तविक पाहता इंग्रज राजवटीत निर्माण झालेल्या सामाजिक सुधारणांमुळे स्त्री आपल्या पारंपारिक क्षेत्रातून बाहेर आली.

प्रस्तावना-

शिक्षणाच्या माध्यमातून तिने आपल्या क्षमता विकसित करायाला सुरूवात केली. त्यामुळे तिचा अत्मविश्वास वाढला. सुरुवातिला डॉक्टर, परिचरिका, शिक्षिका अशा सेवाभावि क्षेत्रात काम करणाज्या स्त्रिया नंतर इतर क्षेत्रात पुढे अलेल्या दिसतात. सरकारी कचेज्यापासून खाजकी क्षेत्रापर्यंत त्याचे कार्यक्षेत्र विस्तरीत जावून लिपिकापासून थेट न्यायाधीश, जिल्हाधिकारी, पंतप्रधान, राष्ट्रपती त्यांनी विविध क्षेत्रात आपले कतृत्व सिद्ध केले आहे. असे असले तरी स्त्रियांची पुरुषप्रधानतेतून आजपर्यंत सुटका झालेली दिसत नाही. सामाजिक, राजकीय, आर्थिक, प्रशासकीय, शैक्षणिक क्षेत्राबरोबर इतर सर्वच क्षेत्रात तिचे शारिरिक, मानसिक, आर्थिक शोषण होत असून बदलत्या काळात पुरूषी अत्याचारांनी वेगळे रूप धारण केले आहे. उंबज्याच्या आत, समाजात, नौकरी क्षेत्रात ती पुरुषी अन्याय, अत्याचाराला बळी पडत आहे. त्यामुळे आजही मानवी समाजाचा एक घटक म्हणून स्त्रियांना मान्यता मिळाली नाही.

संशोधनाची उद्दीष्टे -

१. समाजातील स्त्रियांचे स्थान शोधणे.
२. स्त्रियांची आर्थिक स्थिती पहाणे.
३. स्त्रियांची शैक्षणिक दर्जा जाणून घेणे.
४. स्त्रियांच्या राजकीय सहभागाविषयी माहिती घेणे.

संशोधनाची गृहीतके-

१. आजही पुरूषी अंकारामुळे समाजातील स्त्रियांचे असणारे स्थान सुधारले नाही.
२. स्वातंत्र्योतर काळाध्ये महिला अर्थिक विकासाच्या अनेक योजना तयार करण्यात आल्या परंतु पाहिजे त्या प्रमाणात महिलांचा आर्थिक स्तर उंचवला नाही.
३. आजही शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागामध्ये मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत उदासिनता दिसून येते.
४. स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढावा यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेत अरक्षण दिले आहे. केवळ आरक्षणामुळेच स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढला असल्याचे दिसते.

भारतीय स्त्रियांचा दर्जा -

१.सामाजिक दर्जा -

कोणत्याही देशातील स्त्री ही त्या देशाचे महत्वाचे अंग असते. जगात सर्वत्र मानवी जीवन हे संपुर्णतः स्त्रियांवर अवलंबुन आहे. कारण निसर्गातः प्रजोत्पादनाची म्हणजेच नवीन पिढी तयार करण्याची आणि ती जीवंत ठेवण्याची अत्यंत महत्वाची जबाबदारी स्त्रियांना मिळाली आहे. कारण माणसाच्या उत्पत्तीपासून गेली हजारो वर्षे स्त्रिया ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडतात. हिच एकमेव महत्वपूर्ण जबाबदारी त्या पेलत नसून अशा अनेक जबाबदाज्या त्या दैनंदीन जीवनात पार पाडतांना दिसतात. स्त्रियांना आणि समस्त मानव जातीला काही हाक्क अधिकार जन्मताः प्राप्त झाले आहे. परंतु कालांतराने या मानवी समाज जीवनात काही बदल होत गेले. हे बदल काही चागले तर काही वाईट असे होते. काही नव्हे तर बज्याच भागात हे बदल स्त्रियांवर अन्याय करणारे होते. या सामाजिक बदलातून त्यांच्या समस्या निर्माण झाल्या. आजही समाजामध्ये स्त्रियांकडे दुय्यम भावनेने पाहिले जाते. पुरुष नेहमी वेगवेगळ्या मार्गाचा वापर करून स्त्रियांवर वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. जेवायाला न देणे, मारहन करणे, भिंतीवर डोके आपटणे, केसांना हिसके देणे, गळा दाबणे, चटके देणे, बाहेरून दिसणार नाही अशा ठिकानी मारहान करणे. अशाप्रगकारे स्त्रियांवर अत्याचार करून त्यांचे मानसिक खच्चिकरण केले जाते. त्यामुळे पुरुषांना विरोध करण्याची माणसिकता नसते. आजपर्यंत समाजामध्ये पुरुषप्रधान संस्कृती असल्याचे दिसते.

२. स्त्रियांचा आर्थिक दर्जा -

भारतीय समाजात महिलांना दुय्यम स्थान आहे, असे म्हनण्याचे दिवस आता सपण्याच्या मार्गावर आहेत. कारण महिलांना प्रधान्य देण्याच्या बाबी शासनाच्या वतीने घडत आहेत.समाजातील दुर्बळ गटातल्या महिलांना अल्प व्याजदरांने कर्ज देऊन आर्थिक स्वावलंबी बनविने,या उद्देशाने भारत सरकारने 'भारतीय महिला बॅक' नावाची बॅक नुकतीच सुरू केली. हेतू उदात्त आहे, महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणाच्या दिशेने हे मोठे स्वागतार्थ पाऊल आहे. बॅक दारात आल्याने महिलांना आर्थिक शक्ती मिळेल. अनेक शासकीय निर्णय महिलांच्या उज्वल भवितव्यासाठी घेण्यात येत आहेत. महिलांच्या विकासासाठी अनेक योजना केंद्र,राज्य शासन राबवीत आहेत. भारतीय समाजातील महिला काटक, समंजस, धीर धरणाज्या व प्रयत्नाची पराकाष्टा करणाज्या आहेत. महिलांच्या अंगी जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास व स्थैर्य असते. विपरित परिस्थितीतही महिला संयम व धाडसाने निर्णय घेतात. महिला खरोखरच सर्व प्रकारच्या जबाबदाज्या यशस्वीपणे पार पाडतात.ग्रामीण भागात तर घराशिवाय शेतीची व व्यवहाराची जबाबदारी महिलांवर असते, तसे शेतीला पूरक जोडधंदे यांनासुद्धा महिला समर्थ व सक्षमपने संभाळतात. ्या सर्व बाबी यशस्वी पणे पार पाडणाज्या महिला म्हणजे एक महान व पारंपारिक आचाट शक्तीचा महामेरू होत. महिलांच्या कर्तृत्व, चिकाटी, दुरदृष्टी या गुणांनी भलेभले चकित होतात, यातच महिलांचे श्रेष्ठत्व सामावलेले आहे. अशा या महाण व अघात शक्तीरूपी महिलेला तिच्या अंगाचे कौशल्य व कर्तव्य तथा कर्तृत्व दाखविण्याची संधी दिली. तिच्या कला, कौशल्य व कर्तृत्वाला साह्य केले तर महिला या देशाचे व समाजाचे कल्याण करू शकतात. असे ओळखून शासनाने महिलांच्या विकासासाठी, प्रगतीसाठी विविध योजना राबविल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून महिलांचा सर्वागीन विकास घडवून आनण्याचा शासनाचा प्रयत्न आहे परंतु आजही पाहिजे त्या प्रमाणात महिलांचा आर्थिक विकास झालेला नाही कारण सर्व योजनाची प्रभावीपणे अंमलबजावणी झालेली नाही. ग्रामीण भागापर्यंत या सर्व योजनाची माहिती जात नसल्याने या भागातील महिला या योजनापासून वंचित आहेत.

३.शैक्षणिक दर्जा -

हजारो वर्षापासून अज्ञान, रूढी आणि परंपरामध्ये जखडलेल्या तमान स्त्रियांना मुक्त करण्याचे त्यांनाही 'माणूस' म्हणून जगण्याचे नवे अर्थ देण्याचे विचार सावित्रीबांईच्या व ज्योतीरांवाच्या मनात आले. या विचाराला कार्यरूप देण्यासाठी जानेवारी १९४८ रोजी पुण्यात बुधवार पेठेतील भिडेवाड्यात मुलींसाठी त्यांनी पहिली शाळा सुरू केली. त्या मुळे मुलींसाठी शिक्षणाचे दारे खुली झाली. सुरुवातीला समाज कंठकांनी त्यांच्यावर वेगवेगळे आरोप केले. त्या मुलींला शिकवण्यासाठी सावित्रीबाईची नेमणूक करण्यात आली. सावित्रीबाई फुले या पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या. त्यांच्यावरही समाजाने अनेक अरोप केले; परंतु त्यांनी अपले कार्य नित्याने चालवले. हळुहळु मुलींचे शाळेतील प्रमाण वाढु लागले. शिक्षण घेतलेल्या मुलींना आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव होऊ लागली व त्या अन्यायाला विरोध करण्यासाठी व आपले हक्क मागण्याची ताकत

त्यांच्यामध्ये शिक्षणामुळे निर्माण होऊ लागली. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये स्त्रियांच्या शिक्षणासाठी सरकारने अनेक योजना निर्माण केल्या त्यामुळे थोडयाफार प्रमाणात स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढले.

तक्ता क्र १.१
सन १९७१ ते २०११ पर्यंत स्त्री साक्षरतेची टक्केवारी दर्शवणारा तक्ता

जनगणना वर्ष	एकूण व्यक्ती	पुरूष	स्त्रिया	साक्षरतेची टक्केवारी
१९७१	३४.४५	४५.९६	२१.९७	२३.९८
१९८१	४३.५७	५६.३८	२९.७६	२६.६२
१९९१	५२.२१	६४.१३	३९.२९	२४.८४
२००१	६४.८३	७५.२६	५३.६७	२१.५९
२०११	७४.०४	८२.१४	६५.४६	१६.६८

संदर्भ - जनगणना अहवाल १९७१ ते २०११.
आधार - योजना मासिक दि. जून २०१२ पृ.३१.

वरिल तक्त्यावरून असे दिसून येते की, १९७१ च्या तुलनेत १९८९ मध्ये पुरूष व स्त्री साक्षरतेच्या प्रमाणामध्ये वाढ होत असल्याचे दिसते. परंतु ही तफावत १९८१ नंतर कमी होत गेल्याचे दिसते. पुरुषांच्या प्रमाणात स्त्री शिक्षणाचे प्रमाण भारतात अतिशय कमी असल्याचे दिसते. मुलींसाठी वेगवेगळ्या शैक्षणिक सवलती असून सुद्धा मुलींना शाळेत पाठवण्यास पालक निरूत्साही दिसतात.

४. राजकीय दर्जा -

आपल्याकडे परूषप्रधान संस्कृती असल्यामुळे महिलांना नेहमी दुय्यमस्थान राहिले .आपला समाज यातुन आजुनही पुर्णपणे बाहेर पडलेला नाही. त्यामुळे राजकीय व्यवस्थातही स्त्रियांना सामावून घेण्यासाठी उदासीनता असल्याचे दिसून येते. देशपातळीवर अनेक महत्वाच्या पदावर महिला दिसत असल्या तरी सर्व महीलांची परिस्थिती सुधारली असे नव्हे, तर त्यांना निर्णय घेण्याचे अधिकार आले पाहिजे परंतू असा अधिकार असणारी पदे स्त्रियांच्या वाट्याला येत नाही. कारण राजकारणामध्ये निवडून येउ शकणाज्यांनाच उमेदवारी दिली जाते. निवडून येण्यासाठी जेवढे कर्तृत्व असने गरजेचे असते त्यापेक्षा अर्थिक बळही महत्वाचे असते. शिवाय निवडून येण्यासाठी साम, दाम, दंड, भेद या गोष्टीचाही वापर महत्वाचा ठरतो. अशावेळी कर्तृत्ववान स्त्री् असली तरी उमेदवारी मिळेलच असे नाही तुमच्याकडे आर्थिक बळाबरोबरच इतर गोष्टी असने महत्वाच्या असतात. याच गोंष्टीमध्ये स्त्रिया कमी पडतात. त्यामुळे अनेक पुरूष नेत्याना झुकते माप दिले जाते. महिलांना डावलन्यामागे ही कारने बहुतांश महिलांची राजकीय काराकिर्द संपविन्याला तंतोतंत लागू पडतात. गेल्या ३० वर्षाच्या राजकारणात अनेक महिला नेत्यांनी आपली कारकिर्द वाढवण्यास खुप प्रयत्न केले. पक्षांनी टाकलेली जवाबदारी संभाळत राहिल्या त्या समाधानी असल्याचे दाखवित असल्या तरी त्यांना पक्षांकडून संधीची आशा आहे .

निष्कर्ष -

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना सर्वच क्षेत्रामध्ये समानतेचा अधिकार दिला. स्त्री-पुरुष समानतेचे तत्व भारतीय राज्यघटनेने स्विकारले. स्त्री विषय कायदे आणि महिला चळवळीचे प्रयत्न यामुळे स्त्री प्रश्न सुटण्यास बज्याच प्रमाणात मदत झाल्याचे दिसते. असे असले तरि स्त्रियांना सामाजिक समानता देण्याची पुरुषांची मानसिकता नसल्याचे दिसून येते.त्यामुळे अधुनिक काळात त्यांच्या जीवनात अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसतात. त्यांच्या या समस्या प्रमुख्याने शिक्षण, त्यांच्या पालकांची आणि पतीच्या कुटुंबाची आर्थिक आणि सामाजिक स्थिती या घटकांवर अवलंबून असलेल्या दिसतात.

संदर्भ ग्रथ -

१. उडसे उमा, अनंतराम शरयू (अनु) - भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान - पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९९७.
२.कठारे अनिल(डॉ.), साखरे विजया (डॉ.) - प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती - विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा औरंगाबाद, पहिली आवृत्ती जून - २००८.
३. आ.ह. सांळुखे - हिंदु संस्कृती आणि स्त्री - प्रकाश विश्वासराव लोकवाडमय गृह भूपेश गुप्ता भवन ८५, सत्यानी रोड मुंबई दहावी आवृत्ती डिसेंबर २०१०.
४. राजपूत धोर्डीराम - सक्षम महिला - शुभ प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती डिसेंबर २०११.
५.दुबे सुशील - भारत मे महिला स्वास्य ; एक मुल्याकंन - केंद्रीय समाज कल्याण बोर्ड - दिल्ली डिसेंबर - १९९८.
६. पोले कांताराव प्रल्हाद - महाराष्ट्रातील पंचायतराज आणि महिला आरक्षण - अरूणा प्रकाशन लातूर प्रथम आवृत्ती जानेवारी २००९.
७. दैनिक सकाळ दि.३ डिसेंबर २०१३.
८.लोकराज्य मासिक मार्च २०१२.
९. योजना मासिक दि. जून २०१२.